DAY — **19** SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | III | 07 | 1500 | J-421 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# GEOGRAPHY (39)

Time : 3 Hrs. (8 Pages) Max. Marks : 80

**सूचना :** *(१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*
*(२) आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.*
*(३) रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*
*(४) नकाशा स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*
*(५) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*
*(६) नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी.*

**प्र. १.** दिलेल्या सूचनेनुसार खालील उपप्रश्न सोडवा. **[ २० ]**

**( अ )** 'अ' 'ब' आणि 'क' स्तंभातील घटकांचे सहसंबंध लावून साखळी पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा : (५)

| अ.नं. | 'अ' | 'ब' | 'क' |
|---|---|---|---|
| (१) | ॲमेझॉन खोरे | (१) वस्तू निर्मिती कार्य | (१) टाटा लोहपोलाद उद्योग |
| (२) | संकोचणारा मनोरा | (२) व्यापारी पशुपालन | (२) कमी लोकसंख्येची घनता |
| (३) | औद्योगिक क्षेत्र | (३) वैयक्तिक | (३) जन्मदर कमी व मृत्युदर अगदी कमी |
| (४) | पंपाज गवताळ प्रदेश | (४) दाट विषुववृत्तीय वने | (४) दक्षिण अमेरिका |
| (५) | खाजगी | (५) वृद्धांची संस्था जास्त | (५) उपजिविके करिता रोजगार उपलब्ध |

**(ब)** पुढील विधाने दिलेल्या सूचनेनुसार पूर्ण करा. (५)

(१) अमेरिकेच्या संयुक्त संस्थानातील ॲपेलेशियन पर्वतीय प्रदेशात लोकवस्ती दाट आढळते कारण ......

(अ) विषम नैसर्गिक परिस्थिती

(ब) दुर्गम पर्वतीय प्रदेश

(क) लोह व दगडी कोळशाच्या खनिजांचा विकास

(ड) युद्धजन्य परिस्थिती

(२) मासेमारी क्षेत्रासाठीची सर्वोत्तम स्थिती .......

(अ) दंतूर किनारे, उथळ समुद्र, उष्ण हवामान, प्लवंकांची वाढ

(ब) उथळ समुद्र, उष्ण-थंड सागरी-प्रवाहांचा संगम, प्लवंकांची वाढ, थंड हवामान

(क) भूखंड मंच, प्लवंकांची वाढ, मासेमारीचे उत्तम कौशल्य, थंड हवामान

(ड) भूखंड मंच, दंतूर किनारे, प्लवंकांची वाढ, थंड हवामान

(३) संयुक्त संस्थानांचे औद्योगिक क्षेत्र देशाच्या ईशान्य भागात स्थापन झाले आहे कारण ....

(अ) तेथे लोकवस्ती दाट आहे

(ब) तेथे मोठ्या प्रमाणावर भांडवल उपलब्ध होऊ शकते

(क) तेथे कोळसा लोहखनिजासारख्या खनिजांचा समृद्ध साठा उपलब्ध आहे

(ड) तेथे वाहतूक मार्गांचे केंद्रीकरण झाले आहे

(४) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात अनेक उपप्रदेश आहेत त्यापैकी ......

(अ) नाईलचे मैदान

(ब) गंगा-यमुनेचे मैदान

(क) मिसिसिपीचे खोरे

(ड) ॲमेझॉनचे खोरे

(५) प्रदेशाच्या विकासावर प्रभाव पडणारा प्रमुख नैसर्गिक घटक ......

(अ) साधनसंपत्ती

(ब) लिंग गुणोत्तर

(क) शाळेतील नोंदणी गुणोत्तर

(ड) रोजगार

**( क )** अचूक सहसंबंध ओळखा व लिहा : (५)

A : विधान, R : कारण

(१) A: उष्णकटिबंधीय सदाहरित घनदाट वनातील वृक्षांचे लाकूड अतिशय टणक असते.

R: उष्णकटिबंधीय प्रदेशात व्यापारी तत्त्वावर लाकूडतोड व्यवसाय विकसित होऊ शकत नाही.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत आणि R हे Aचे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

(२) A: भारतात औद्योगिक प्रदेश विशिष्ट ठिकाणी केंद्रित झालेले आहेत.

R: भारत हा कृषिप्रधान देश आहे.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहे आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

(३) A: तृतीयक आर्थिक व्यवसायात निसर्गातून काही घेतले जात नाही.

R: केवळ सेवा दिली जात असल्याने त्या व्यवसायांना सेवा व्यवसाय म्हणतात.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहे आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

(४) A: प्रत्येक औपचारिक प्रदेशाचा वेगळ्या सीमा असतात, ज्यामुळे प्रदेश ओळखणे सोपे जाते.

R: ही क्षेत्रे आर्थिक क्रियांमुळे एकमेकांशी बांधलेली आहेत.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहे आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

(५) A: प्राकृतिक किंवा मानवी घटक स्थिर नसून ते अतिशय गतिशील आहेत, काळानुसार ते बदलतात.

R: पृथ्वीवर सदैव परिवर्तन होत असल्याने तिच्या प्राकृतिक व सांस्कृतिक पर्यावरणात विविधता अढळते.

(अ) केवळ A बरोबर आहे.

(ब) केवळ R बरोबर आहे.

(क) A आणि R हे दोन्ही बरोबर आहे आणि R हे A चे अचूक स्पष्टीकरण आहे.

(ड) A आणि R हे दोन्ही बरोबर आहेत परंतु R हे A चे अचूक स्पष्टीकरण नाही.

**(ड)** चुकीचा घटक ओळखा व लिहा : (५)

(१) खनिजांमुळे दाट लोकवस्तीचा बनलेला प्रदेश –

(अ) ऑस्ट्रेलियातील वाळवंटी प्रदेशातील सोन्याच्या खाणीचा प्रदेश

(ब) नैऋत्य आशियातील खनिजतेल उत्पादक प्रदेश

(क) भारतातील खनिज उत्पादक छोटा नागपूर पठार

(ड) उत्तर अमेरिकेतील प्रेअरी प्रदेश

(२) नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून असणारे प्राथमिक व्यवसाय –

(अ) शेती (ब) शिकार

(क) मोटार उद्योग (ड) लाकूडतोड

(३) स्थानमुक्त उद्योग–

(अ) सिमेंट निर्मिती उद्योग

(ब) घड्याळे निर्मिती उद्योग

(क) हिरे तासणे उद्योग

(ड) केसाच्या पिना निर्मिती उद्योग

(४) अंटार्क्टिका खंडात स्थायी मानवी वस्ती आढळत नाही –

(अ) अतिशीत हवामान (ब) सुपीक जमीन

(क) बर्फाच्छादित जमीन (ड) दीर्घकालीन हिवाळा

(५) प्राकृतिक भूगोलात अभ्यासले जाणारे घटक –

(अ) वातावरणाचे घटक (ब) भूस्वरूप

(क) सरोवरे (ड) दळणवळण

**प्र. २. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा ( कोणतेही चार ) :** **[१२]**

(१) लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे द्योतक आहे.

(२) भारतात शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो.

(३) उद्योगधंद्याचे वितरण असमान असते.

(४) मध्य ऑस्ट्रेलियात उद्योगाचा विकास झालेला नाही.

(५) निरक्षरता, दारिद्र्य या सारख्या घटकांचा प्रादेशिक विकासावर परिणाम होतो.

(६) भूगोल विषयाचे स्वरूप द्वैतवादी आहे.

**प्र. ३. खालील फरक स्पष्ट करा ( कोणतेही तीन ) :** **[९]**

(१) भूमी उपयोजन व भूमी आच्छादन

(२) सार्वजनिक उद्योग व खाजगी उद्योग

(३) प्राकृतिक प्रदेश व राजकीय प्रदेश

(४) प्रादेशिक विकास व प्रादेशिक असमतोल

(५) निसर्गवाद व संभाव्यवाद

प्र. ४. **( अ )** दिलेल्या जगाच्या नकाशात पुढील बाबी योग्य सूची किंवा चिन्हांच्या साहाय्याने दाखवा आणि सूची तयार करा (कोणतेही सहा): (६) [११]

(१) दक्षिण–अमेरिका खंडातील विरळ लोकसंख्येचा प्रदेश

(२) लोकसंख्या संक्रमण अवस्थेतील दुसऱ्या टप्प्यातील आफ्रिकेतील एक देश

(३) महाराष्ट्रातील प्रमुख प्रशासकीय शहर

(४) ऑस्ट्रेलियातील पशुपालन क्षेत्र

(५) आशिया खंडातील मासेमारीत अग्रेसर देश

(६) केप ऑफ गुड होप जलमार्ग


(७) नाईल नदीचे खोरे

(८) सैबेरियाचे पठार

**( ब )** दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा : (५)

**भारत : व्यवसायिक संरचना**
**( प्राथमिक सेवा क्षेत्र )**

**प्रमाण :** 1 **से.मी.** = 10%



प्रश्न :

(१) पुढील आलेखामध्ये काय दर्शविले आहे?

(२) सर्वात जास्त शेतकऱ्यांची टक्केवारी कोणत्या दशकात दिसून येते?

(३) सर्वात कमी शेतमजुरांची टक्केवारी कोणत्या दशकात दिलेली आहे?

(४) दिलेल्या स्तंभालेखात कोणत्या घटकांची टक्केवारी सर्वच दशकात जास्त दिसून येते?

(५) वर्ष १९७१ मध्ये शेतकरी व शेतमजुरांची टक्केवारी किती आहे?

**प्र. ५. खालीलपैकी संक्षिप्त टिपा लिहा ( कोणत्याही तीन ) :** **[१२]**

(१) जन्मदर आणि मृत्युदरातील सहसंबंध

(२) संमिश्र भूमी उपयोजन

(३) शिकार व परिसंस्थेचा ऱ्हास

(४) वाहतुकीची उद्योगाच्या विकासातील भूमिका

(५) संदेशवहनातील कृत्रिम उपग्रहाचे महत्त्व

**प्र. ६. ( अ )** खालील उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (४) **[८]**

पशुपालन व्यवसायाचे जागतिक वितरण ३०° ते ६०° उत्तर व ३०° ते ५५° दक्षिण अक्षवृत्तादरम्यान झालेले दिसते. या व्यवसायावर हवामानाचा प्रभाव दिसून येतो. उत्तर गोलार्धामध्ये या व्यवसायाचा विकास जास्त झालेला आढळतो.

ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण व उत्तर अमेरिका खंडातील पशुपालन विस्तीर्ण गवताळ कुरणे, अत्याधुनिक तंत्र, बाजारपेठ आणि जमिनीच्या मोठ्या भागावर उपलब्धता यांनी प्रभावित झालेले आहे. उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका व ऑस्ट्रेलियामध्ये यांचा विकास व्यापारी दृष्टीने झाला. दक्षिण अमेरिका व उत्तर अमेरिकेतील पशुपालन उच्च तंत्रज्ञानावर आधारित असून तेथे या व्यवसायाचे यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. घनदाट वने, रोगट हवामान,

निकृष्ट चारा असणाऱ्या विषुववृत्तीय प्रदेशात या व्यवसायाचा विकास फारसा झालेला नाही.

प्रश्न :

(१) पशुपालन व्यवसायाचे जागतिक वितरण कोणत्या अक्षवृत्ताच्या दरम्यान झालेले आढळते?

(२) पशुपालन व्यवसायाचा सर्वात जास्त विकास कोणत्या गोलार्धात झालेला आहे?

(३) ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण व उत्तर अमेरिका खंडातील पशुपालन व्यवसाय कोणत्या घटकामुळे प्रभावित झालेले आहे?

(४) जगातील पशुपालन व्यवसायाचे यांत्रिकीकरण झालेले खंड कोणते?

**( ब )** आकृती काढून नावे द्या (कोणतेही दोन) : (४)

(१) स्थिरावलेला मनोरा

(२) वर्तुळाकार वस्ती

(३) भूगोलाचा अन्य विषयाशी असलेला सहसंबंध

**प्र. ७. खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तरे लिहा ( कोणताही एक ) :** **[८]**

(१) लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे मानवी घटक स्पष्ट करा.

(२) व्यापारावर परिणाम करणारे घटक स्पष्ट करा.

◆◆◆